तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क.शिउसं/माध्य-३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१४/ 90२०९/१२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांकः- 12 MAY 2014 (52)

प्रति
अध्यक्ष/सचिव,
**स्वामी विवेकानंद प्रतिष्ठाण उरुळी कांचन ता.हवेली**

विषय - सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. २४) दिनांक २ जुलै २०१३.
२. शासन निर्णय एसएएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २६ फेब्रुवारी २०१४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शतीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १३४४ | पुणे | स्वामी विवेकानंद प्रतिष्ठाण उरुळी कांचन ता.हवेली | स्वामी विवेकानंद विद्यालय, उरुळी कांचन ता.हवेली | मराठी | दर्जावाढ | माध्यमिक | २०१४-१५ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१०. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.
११. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.
१२. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

10/5/14
(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा.रा.ग.गुंजाळ,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.